# Sant Gadge Baba Amravati University, Amravati
## Internal Quality Assurance Cell
## Report of Master Trainer Orientation Programme
(School Connect NEP-2020)

The Master Trainers Program in the University was concluded on January 12, 2024 to implement the School Connect campaign within the University as directed by the Government of Maharashtra. In this program, 149 resource persons (master trainers) from all five districts have been trained and these master trainers are going to convince the students of the importance of the new National Education Policy in the colleges and schools of their areas, informed IQAC director Dr. Sandeep Waghuley gave. On this occasion, Pro-Vice Chancellor Dr. Prasad Wadegaonkar presided over the platform. Expert Principal Dr. A.B. Marathe and the Dean of the Faculty of Science and Technology Dr. Sanjay Dudul and IQAC Director Dr. Sandeep Waghuley were present.

Expert Principal Dr. A.B. Marathe said that the Government of Maharashtra has started a good initiative called School Connect to create public awareness on behalf of the university and for students to enter the higher education system. Efforts to increase will be made through this. NEP. This is to be told to the students studying from school education to college education and its information will be conveyed to the students, teachers and parents by master trainers trained in the workshop. Jobs that existed ten years ago are gone due to automation. 85 million jobs have been lost. Compared to that, 97 million new jobs are being created. For that NEP constantly changing courses are being prepared as per students who do not have 21$^{st}$ century skills will remain unemployed. He highlighted that the skills that the market needs, students should get through the curriculum.

Under this program, Experts Principal Dr. A.B. Marathe and Dr. Sanjay Dudul presentations were prepared by inviting and the said presentations were made available to 149 persons present at the master trainer orientation program.

IQAC Director Dr. Sandeep Waghuley said, as per the instructions of the Maharashtra Government, the School Connect initiative is to be implemented through the colleges from 15$^{th}$ to 31$^{st}$ January.

Sd/-
(Prof. Dr. Sandeep Waghuley)
Director, IQAC

# <u>संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती</u>

## अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

## मास्टर ट्रेनर ओरिएंटेशन प्रोग्रामचा अहवाल

## (स्कूल कनेक्ट NEP-2020)

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे विद्यापीठा अंतर्गत स्कूल कनेक्ट अभियान राबविण्यासाठी विद्यापीठामध्ये मास्टर ट्रेनर्स (साधन व्यक्तीं) कार्यक्रम दिनांक १२ जानेवारी, २०२४ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमात पाचही जिल्ह्यांतील १४९ साधन व्यक्तींना (मास्टर ट्रेनर्सला) प्रशिक्षण देण्यात आले प्रशिक्षित करण्यात आले असून हे मास्टर ट्रेनर्स आपल्या भागातील महाविद्यालये व शाळांमध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देणार आहेत, अशी माहिती आयक्युएसी संचालक डॉ. संदीप वाघुळे यांनी दिली. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्र- कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर, तज्ञ प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे आणि विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजय डुडुल व आयक्युएसी संचालक डॉ. संदीप वाघुळे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे म्हणाले की, विद्यापीठाच्यावतीने जनजागृती व्हावी तसेच उच्च शिक्षण व्यवस्थेत विद्यार्थ्यांना येण्यासाठी स्कूल कनेक्ट हा चांगला उपक्रम महाराष्ट्र शासनाने सुरू केला असून महाराष्ट्राचा जी.ई.आर. वाढविण्याचा प्रयत्न या माध्यमातून होणार आहे. एन.ई.पी. हे शालेय शिक्षणापासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना सांगायचे असून त्याची माहिती विद्यार्थी, शिक्षक व पालकांपर्यंत कार्यशाळेत प्रशिक्षित झालेले मास्टर ट्रेनर्स पोहोचविणार आहेत. दहा वर्षांपूर्वी ज्या नोकऱ्या होत्या, त्या ऑटोमेशनमुळे गेलेल्या आहेत. 85 मिलीयन जॉब संपले आहेत. त्या तुलनेत 97 मिलीयन नवीन जॉब्स निर्माण होत आहे. त्याकरिता एन.ई.पी. नुसार वारंवार नवनवीन सतत बदलणारे अभ्यासक्रम तयार होत आहे. एकविसाव्या शतकातील स्कील ज्या विद्यार्थ्यांकडे नाही, ते बेरोजगार राहणार आहेत. मार्केटला जे स्कील हवे, ते विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाच्या माध्यमातून मिळायला हवे, यावर त्यांनी प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाअंतर्गत तज्ञ प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे आणि डॉ. संजय डुडुल आमंत्रित करून एक सादरीकरण तयार करण्यात आले असून सदर सादरीकरण हे अभिमुखता उदबोधन प्रशिक्षण कार्यशाळे उपस्थित १४९ साधन व्यक्तींना उपलब्ध करून देण्यात आले.

विद्यापीठ गीताने सुरू झालेल्या कार्यक्रमात प्रास्ताविकतेतून आयक्युएसी संचालक डॉ. संदीप वाघुळे यांनी सांगितले, महाराष्ट्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे स्कूल कनेक्ट हा उपक्रम १५ ते ३१ जानेवारी दरम्यान महाविद्यालयांच्या माध्यमातून राबवावयाचा आहे.

स्वा /-
(प्रा.डॉ. संदीप वाघुळे)
संचालक, आय.क्यु.ए.सी.

